पूर्वा कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
डॉ. बी.बी. पवार

संपादक
डॉ. भास्कर गायकवाड

संपादन सहयोग
पराग वाड

चित्रांकन आणि मांडणी
कैलास भामरे

व्यवस्थापक – लेखा विभाग
राजेंद्र बागुल

सहकार्य
विजय पवार
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

सुहास कदम
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

महेश पाटील
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

विजय नाईकरे
विभागीय व्यवस्थापक– पूर्वा केमटेक, पुणे

सचिन दिघे
विभागीय व्यवस्थापक– पूर्वा केमटेक, संगमनेर

रईस इनामदार
विभागीय व्यवस्थापक– पूर्वा केमटेक, कोपरगाव

नंदकिशोर चतरकर
विभागीय व्यवस्थापक– पूर्वा केमटेक, विदर्भ

संजय पाटील
विभागीय व्यवस्थापक– पूर्वा केमटेक, मराठवाडा

पूर्वा केमटेक प्रा.लि.,
एम ११३, एमआयडीसी अंबड,
नाशिक–४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

# संपादकीय



डॉ. भास्कर गायकवाड
(संपादक : ‘पूर्वा कृषिदूत’)
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

## कौशल्याचा अंगिकार करा; नापिकीचं शल्य विसरा!

### युवा पिढीने आत्मसात करावा नव्या कृषितंत्राचा मंत्र

- शेतीकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन बदलला पाहिजे
- निरुपाय म्हणून नव्हे; तर आव्हान स्वीकारून वावरात पाऊल ठेवा
- ‘जगाचा पोशिंदा’ असल्याचा अभिमान बाळगूनच करा हा व्यवसाय
- ‘हवामानावर आधारित कृषिविमा’ ठरेल जीवनदायी
- विविध कृषिपूरक व्यवसायांचा लाभकारक पर्याय निवडा
- शेतीच्या उद्यम–शिक्षणाचे महत्त्व सर्वांनीच ओळखावे
- शासनानं योजनांद्वारे; तर समाजानं पाठबळ देऊन करावी मदत

कृषी क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टिकोन सतत बदलत राहिलेला आहे. पूर्वीच्या काळी उच्च शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असे म्हटले जात होते. नंतरच्या काळात व्यवसाय आणि व्यापाराला उच्च स्थान मिळाले. आज उच्च नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती अशी स्थिती आहे. मागील दहा वर्षांपासून तर शेती व्यवसायाची आत्महत्येसारख्या टोकाच्या दुर्दैवी घटनांशीच जणू सांगड घातली गेली आहे! एका ठिकाणी तर एका चित्रामध्ये एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याचे बघितल्यानंतर, एक मुलगा त्याच्या वडिलांना विचारतो की, बाबा त्याने का आत्महत्या केली? तर त्या मुलाला त्याच्या वडिलांकडून उत्तर मिळते, ते म्हणजे– ‘तो माणूस शेती करत होता म्हणून त्याने आत्महत्या केली!’ या प्रकारचे चित्र समाजासमोर विशेषत: तरुण पिढीसमोर सतत राहिले तर त्यांची मानसिकता किती प्रतिकूल तयार होईल, याचा गांभीर्याने कोणीही विचार करत नाही.

तसे बघता, शेती व्यवसायाची तुलना इतर उद्योग किंवा व्यापाराशी कधीही करू नये; कारण मुळातच शेती हा केवळ नफेखोरीचा विचार करणारा कोरडा व्यवहार नसून एक सेवा आहे, एक धर्म आहे. समाजाला अन्नधान्याचा पुरवठा करणे ही सर्वात मोठी समाजसेवा–ईश्वरसेवा आहे असे पूर्वज म्हणत. बेरोजगारांना रोजगार देणारा, कमीत कमी भांडवली गुंतवणुकीमध्ये जास्तीत

जास्त रोजगार निर्माण करणारा आणि ग्रामीण भागाला आधार देणारा खरा व्यवसाय म्हणजे शेती व्यवसाय. शेती एक सांस्कृतिक परंपरा आहे, त्याकडे त्याच पध्दतीने बघितले पाहिजे. शेती म्हणजे काही कारखाना नाही. परंतु अनेकदा शेती क्षेत्राबाबत शेतकरी स्वत:च प्रतिकूल गोष्टींचा प्रसार आणि प्रचार करतो. शेतकरी स्वत:च आपल्या स्वत:च्या मुलाच्या सतत मनावर बिंबवतो की, चांगले शिक्षण घे आणि शिक्षण घेऊन कोणतीही नोकरी कर. शिक्षण घेऊन नोकरी केली नाही तर शेण उचलावे लागेल किंवा पिकाला पाणी भरावे लागेल. म्हणजेच आज जगामध्ये सर्वात निकृष्ट काम कोणते असेल तर ते म्हणजे स्वत:कडील गाईचे शेण उचलणे किंवा स्वत:च्या शेतातील पिकाला पाणी देणे! मुलगा शिकून शिपाई - वॉचमन झाला किंवा कारकून होऊन नुसते खर्डेघाशीचे कितीही हलक्या दर्जाचे काम केले तरी चालेल परंतु त्याने शेती करू नये! याचा परिणाम आज शेती क्षेत्राकडे बघण्याच्या युवकांच्या दृष्टिकोनावर झालेला आहे. शिक्षण पूर्ण झाले, कोणतीही नोकरी मिळाली नाही म्हणून शेती करतो. म्हणजेच कोणतेही काम जमत नाही म्हणून तू शेती कर, ही प्रवृत्तीच खरे तर शेतीच्या प्रगतीला आडवी येते आहे.

## ‘नाईलाज’ म्हणून शेती करणं अहिताचं!

शिक्षण घेऊन शेतीकडे आलेल्या तरुणाची मानसिकताही अशीच असते. तो आपल्या शेतातील प्रत्येक काम आवडीने करण्याऐवजी नाईलाज म्हणून करतो. समाजही सारखा त्याला टोचणी देत असतो. एवढे शिक्षण घेऊन शेवटी शेतीच करावी लागली ही भावना सर्वांच्या मनात तयार होते. बोहल्यावर चढण्यातही अनंत अडचणी येतात. शेतीवर बंगला असला तरीही मुलीचे वडील मुलगी द्यायला तयार होत नाही. शहरातील खुराड्यात मुलगी ठेवण्याची तयारी मुलीकडील मंडळींची असते. या सर्व सामाजिक वातावरण निर्मितीला जबाबदार कोण? शेती एवढ्या कनिष्ठ दर्जाची मग सर्वांचे पोट कोण भरणार? शेतीमध्ये फायदा नाही मग आजपर्यंत ग्रामीण अर्थव्यवस्था कशावर उभी आहे? याचा विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. शहरी भागातील समाजानेही शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. कारण शेतीमुळेच सर्वांना अन्नधान्याचा पुरवठा होतो. शहरीकरण आणि औद्योगीकरणामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी हिरवी झाडे, वनस्पती, पिके यांची आवश्यकता असते, ते त्यांची वाढ करतात. म्हणजेच अन्नधान्याबरोबरच शुध्द हवा पुरविण्याचे कामही शेतकरी करतो. मग शेती किंवा शेतकऱ्यांसाठी शासनाने मोठ्या प्रमाणात मदत केल्यास इतरांनी नाक मुरडण्याची गरज नाही.

शेती क्षेत्र अत्यंत उत्तम, सुजलाम- सुफलाम आहे असे म्हणता येणार नाही. शेती क्षेत्रात आजही अनेक प्रश्न आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विचार करून ते सोडविण्यासाठीचे प्रयत्न फारच कमी आहेत. महागाई भत्याचा विचार सर्वांसाठी करत असताना शेतकऱ्यांच्या उत्पादनाची किंमत मात्र महागाई भत्याच्या प्रमाणात वाढत नाही. प्रत्येक दहा वर्षांनी पगाराचा फेरआढावा घेऊन नवीन वेतनश्रेणी लागू होते परंतु ती व्यवस्था शेती आणि शेतकऱ्यांसाठी नाही. शेतीमध्ये कष्ट आहेत, खर्च आहे मात्र उत्पादन निसर्गाच्या हातात आणि बाजारभाव ग्राहक आणि व्यापाऱ्यांच्या हातात. ‘मामा’ (मान्सून आणि मार्केट) शेतकऱ्याला कधी धोका देईल हे सांगता येत नाही. त्यासाठी योग्य ते संरक्षणही नाही. परंतु हे सर्व असून आजही शेती क्षेत्रामध्ये सुदैवाने चांगल्या गोष्टी बघायला मिळतात. नवनवीन प्रयोग सुरु असतात आणि शेतीला दिशा देण्याचे काम होत असते. शेती हे खरे तर नवनिर्मितीचे लक्षण आहे. हे काम करतात तरुण, शिक्षण घेतलेले ग्रामीण युवक की ज्यांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन मुळातच पॉझिटिव्ह आहे. नवनिर्मितीमध्ये ते आनंद घेतात, फक्त व्यावहारिकतेचा विचार मात्र केला

जात नाही.

## वैविध्यपूर्ण कृषी उत्पादनांना मागणी

शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. पूर्वीसारखा फक्त भाजी-भाकरी व डाळभात खाणारा समाज आज राहिलेला नाही. त्याला त्याच्या आहारामध्ये विविधता पाहिजे आहे. ग्राहक हा जागृत झालेला आहे. समाजाला स्वत:च्या आरोग्याबाबत काळजी आहे. आहारातून आरोग्य चांगले राहते याबाबत समाजाची पूर्ण खात्री झालेली आहे. आहारामध्ये विभिन्नता आणि विविधता आवश्यक आहे. त्यासाठी वर्षभर आहारामध्ये विविधता आणण्यासाठी त्याचे प्रयत्न असतात. मग त्यासाठी कोणतीही किंमत मोजण्याची त्याची तयारी असते. फळे- भाजीपाला, कडधान्ये, मांसाहार, (मांस, मटण, मासे, अंडी) यासारख्या बाबींची मागणी गहू, ज्वारी, बाजरी, तांदूळ यांच्याबरोबर वाढत आहे. मागणी वाढत असताना फक्त त्या वस्तूच्या वजनाचा विचार न करता त्याच्या गुणांचाही विचार सुरु झालेला आहे. ग्राहकांमध्ये चवीने (जिभेने) खाण्याबरोबरच 'नजरेने' आणि 'मनाने' खाण्याचे (गार्निश्ड फूड) प्रमाणही वाढत आहे; याचा विचार करण्याची गरज आहे. ग्राहकांच्या या बदलत्या सवयीचा अभ्यास करून त्यानुसार फायदा घेण्याची गरज आहे. लोकसंख्येमध्ये वाढ होत असताना जमीन, पाणी यांचे प्रमाण शेतीसाठी कमी होत आहे. त्यामुळे भविष्यात अन्नधान्य सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणार आहे. अन्नधान्य सुरक्षेबरोबरच इंधन सुरक्षा (बायोडिझेल, इथेनॉल निर्मिती) यासाठी शेती क्षेत्राकडे मोठ्या अपेक्षेने बघितले जाते. अलीकडे जागतिक पातळीवर होणारे बदल हे शेती क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढणे व परिणामी जास्त फायदा होणे यासाठी पोषक वाटतात. कमी पाण्यात, कमी जागेत चांगल्या दर्जाचे जास्त उत्पादन काढण्याची क्षमता ज्याच्याकडे असेल त्याच्याजवळ लक्ष्मी नांदणार ही आज काळ्या दगडावरची रेष आहे. सर्वात महत्त्वाचा विचार म्हणजे कृषी क्षेत्राकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघितले तर शेती क्षेत्र हाच नजीकच्या काळात सर्वात शाश्वत व्यवसाय होणार आहे.

## व्यापक रोजगारसंधीचे क्षेत्र

कृषी क्षेत्राद्वारे आजही मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे. एकूण रोजगारापैकी ५९ टक्के रोजगार निर्मिती कृषी क्षेत्रातून होत आहे. फक्त ग्रामीण भागाचाच विचार केला तर ७३ टक्के रोजगार कृषी व कृषिसंलग्न व्यवसायातून होत आहे. एकूण १००० हेक्टर बागायत जमीन असेल तर ९०० शेतकरी आणि ७६० मजूर यांचा उदरनिर्वाह होत असतो. म्हणजेच शेतीला किती महत्त्व आहे हे लक्षात येईल. अर्थात आज शहरीकरण, औद्योगीकरण आणि विशेष आर्थिक क्षेत्र विकासाच्या नावाखाली शेतजमिनी कमी होत आहेत. त्याचा परिणाम ग्रामीण रोजगार निर्मितीवर होणार आहे.
औद्योगीकरणामधील एकूण गुंतवणूक आणि निर्माण होणाऱ्या रोजगाराचा विचार केला तर कृषी क्षेत्रातील गुंतवणूक निश्चितच किफायतशीर आहे. म्हणूनच ग्रामीण भागामध्ये कृषी क्षेत्राशी संबंधित गुंतवणूक केली तर त्याचा फायदा जास्त होणार आहे. औद्योगीकरणासाठी विशेष आर्थिक क्षेत्राचा विकास करण्याबरोबरच विशेष कृषी विकास आणि निर्यात क्षेत्र तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक केली पाहिजे. त्याचा कृषी व कृषिपूरक व्यवसायांमध्ये वृध्दी होण्याबरोबरच ग्रामीण भागाचा विकास होण्यास मोठा हातभार लागेल. पीक उत्पादन, फलोत्पादन, दुग्ध व्यवसाय हे शेती व्यवसायाचे मुख्य तीन आधारस्तंभ. या मुख्य व्यवसायांबरोबरच शेतीवर आधारित असंख्य व्यवसाय आहेत. तसे बघता शेती हा एकात्मिक उत्पादनलक्षी श्रेणीतील व्यवसाय आहे. एक पीक किंवा एका व्यवसायावर आधारित शेती कधीही फायद्याची होत नाही. अशा व्यवसायामध्ये अशाश्वती असते. कारण त्यामध्ये नैसर्गिक आपत्ती, बाजारपेठ याबरोबरच इतरही अनेक कारणांमुळे ते पीक किंवा

व्यवसाय तोट्यात गेल्यास शेतकरी खचून जातो. उलटपक्षी वर्षभर त्याच्या हाताला काम, मनाला विचार करायला अवसर मिळाल्यामुळे उत्पादनात सातत्य राहते. म्हणून एकात्मिक शेती पध्दतीला महत्त्व आहे. यामध्ये कृषी क्षेत्रावर आधारित उद्योग आणि व्यवसाय यांचा विचार आज युवा पिढीने करण्याची गरज आहे. पीक उत्पादनामध्ये पारंपरिक पध्दतीने पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन आणि आंतरमशागती यांचा अवलंब न करता सूक्ष्म सिंचन पध्दत, योग्य प्रकारचे फर्टिगेशन, यांत्रिकीकरण यांचा वापर केला तर ज्या शारीरिक कष्टाला आणि त्रासाला तरुण मंडळी घाबरतात त्यापासून त्यांची सुटका होईल. या कामामुळे राहिलेल्या शिल्लक वेळेत त्यांच्या शेतीला पूरक होईल, असा व्यवसाय त्यांनी केलाच पाहिजे.

### फलोत्पादनातून 'लक्षाधीश' होणे शक्य

फलोत्पादन व्यवसायाला मोठी मागणी आहे. त्यामध्ये अधिक फायदा आहे आणि ज्ञानाबरोबरच काम करण्यासाठीही मोठा वाव आहे. चांगल्या प्रतीचे फलोत्पादन मिळवणारा शेतकरी सहज 'लाखाची भाषा' बोलू शकतो! फलोत्पादन क्षेत्रामध्ये लागवडीपासून ते विक्री व्यवस्थेपर्यंत मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीला वाव आहे. मग बागेची छाटणी असो की फवारणी, काढणी असो की पॅकिंग, सेवा-सुविधा पुरवठा यांसारख्या माध्यमातून अनेकांना रोजगार देण्याचे काम फलोत्पादनाद्वारे होत आहे. अर्थात यामध्ये भविष्यात देखील मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. कारण आर्थिक प्रगतीबरोबरच खाण्याच्या बदलत्या सवयींमुळे फलोत्पादनाला मोठी मागणी वाढत आहे. फलोत्पादनामध्ये काढणीपश्चात तंत्रज्ञान आणि त्यावर प्रक्रिया यासारखे उद्योग भविष्यात जास्त वाढणार आहेत. यातून रोजगार निर्मिती वाढेलच परंतु उत्पादकांनाही दोन पैसे मिळण्यास मदत होईल. पारंपरिक फलोत्पादनाबरोबरच नवीन फलोत्पादनाला मागणी वाढत आहे. हंगामातील उत्पादनाबरोबर बिगर हंगामी उत्पादनालाही मागणी वाढत आहे. त्याचा विचार करून पॉलिहॉऊस, शेडनेट हाऊस यामधील उत्पादनापासून जास्त फायदा मिळविता येतो, असे अनेक शेतकऱ्यांनी सिध्द केले आहे.

### पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसायाला मागणी

दूध, दुग्धजन्य पदार्थांबरोबरच मांसाहाराचीही मागणी वाढत आहे. दुग्ध व्यवसायामध्ये दुधाची चांगली प्रत असेल तर त्यापासून जास्तीचा आर्थिक फायदा होतो. तसेच दुग्धजन्य पदार्थांपासूनही चांगला आर्थिक लाभ मिळविता येतो. दुग्ध व्यवसायावर आज शेतकरी कुटुंबांबरोबरच अनेक भूमिहीन मजुरांची कुटुंबे आपला उदरनिर्वाह करतात. भविष्यात वाढणाऱ्या मागणीमुळे दुग्ध व्यवसायात वाढ करण्याला मोठ्या प्रमाणात वाव आहे. गाव पातळीवर छोट्या स्वरुपात कूलिंग व पॅकिंग युनिट सुरु केल्यास त्याची विक्री व्यवस्था करणे सोपे होते. दुग्ध व्यवसायाबरोबर कुक्कुटपालन, शेळी/मेंढीपालन, वराहपालन यांसारखे व्यवसाय शेतीपूरक आहेत. या व्यवसायांना सध्या चांगली मागणी असून, भविष्यातही मोठी मागणी राहणार आहे. कुक्कुटपालनामध्ये करार पध्दतीने ब्रॉयलर फार्म ही संकल्पना मोठ्या प्रमाणात पुढे आलेली आहे. चांगले व्यवस्थापन ठेवल्यास मोठ्या प्रमाणात हमखास फायदा देणारा हा व्यवसाय आहे. ब्रॉयलर कोंबड्यांबरोबरच स्थानिक गावरान कोंबडीला मागणी वाढत आहे. यामध्ये नवनवीन जास्त अंडी तसेच मटणाचे उत्पादन देणाऱ्या कोंबड्यांच्या जातींचा वापर करून गावरान कोंबडी फार्म सुरु केले तर हाही एक चांगला उद्योग ग्रामीण भागामध्ये सुरु करता येतो. इनक्युबेटर मशिनद्वारे स्थानिक कोंबड्यांची पिल्ले तयार करून त्यांचा पुरवठा करणे हाही एक चांगला व्यवसाय आहे. गावरान कोंबडीच्या मटणाला मोठ्या प्रमाणात मागणी असते व त्याला दरही जास्त मिळतो. कुक्कुटपालनाप्रमाणे शेळी/मेंढीच्या मटणाला मागणी वाढत आहे.

अनेकदा मागणीनुसार पुरवठा न झाल्यामुळे त्यांच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असते. मांसाहार वाढत असताना हा व्यवसाय चांगला आर्थिक फायदा करून देण्यास सक्षम आहे. तसेच या व्यवसायाद्वारे मिळणारे उप-पदार्थ म्हणजेच शेणखत, लेंडीखत, कोंबडीखत हे शेतीच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे असल्यामुळे त्यांना मागणीही चांगली असते. शेणखताद्वारे गांडूळखत निर्मिती करून नवीन व्यवसाय सुरु करता येतो. तसेच गोबर गॅस यंत्राद्वारे गॅसनिर्मिती करून स्वत:च्या वापरासाठी गॅस तसेच वीज तयार करता येईल. म्हणजेच पशुपालन व दुग्धव्यवसायाद्वारे दुहेरी फायदा मिळू शकतो. गोमूत्र, व्हर्मीवॉश यांसारख्या नैसर्गिक पीक संजीवकांची निर्मिती करून त्यांचाही वापर शेती उत्पादन वाढविण्यासाठी करता येतो. व्यापारी तत्त्वावर हा एक चांगला व्यवसाय होऊ शकतो.

## इतर अनेक कृषिपूरक व्यवसाय लाभदायी

पीक उत्पादन, फलोत्पादन आणि पशुपालन- दुग्धव्यवसाय हे शेतीच्या एकात्मिक पध्दतीतील तीन मुख्य आधारस्तंभ असले तरीही कृषिपूरक इतर अनेक व्यवसाय करण्यासारखे आहेत. त्याद्वारे ग्रामीण भागामध्ये स्वयंरोजागर निर्मिती होते. रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन, गांडूळखत निर्मिती, मत्स्यपालन, जैविक खत निर्मिती, जैविक कीटकनाशके निर्मिती, वनस्पतीजन्य कीटकनाशके निर्मिती, फळे- भाजीपाला प्रक्रिया, शेती व्यवसायासाठी उपयुक्त सेवा-सुविधा पुरवठा, रोपवाटिका, बीजोत्पादन, गोडावून, कोल्ड स्टोरेज, ट्रान्सपोर्ट यांसारखे अनेक व्यवसाय ग्रामीण भागामध्ये करता येतात. अर्थात यासाठी मूलभूत सेवा आणि पायाभूत सुविधांची उपलब्धता असणे गरजेचे आहे. मायक्रोफायनान्स, मायक्रो इन्शुरन्स, कृषी विमा, पशु-पक्षी विमा, प्रकल्प आराखडा तयार करणे, विविध यंत्रणांकडून व्यवसायासाठी आवश्यक बाबींची उपलब्धता करणे तसेच योग्य वेळी योग्य सल्ला सेवा देणे या बाबी कृषिपूरक व्यवसाय सुरू करण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. या सेवा-सुविधा देण्यासाठी उच्चशिक्षित ग्रामीण युवकांची गरज आहे. त्यातूनच त्यांना रोजगार मिळू शकतो. तसेच एकात्मिक शेती पध्दतीचा अवलंब करून येणाऱ्या संकटांचा त्यांना सक्षमपणे सामना करता येतो.

## ठोस कृती कार्यक्रम; सकारात्मकता हवी

युवा पिढीने आपला सर्वात पहिला कृती कार्यक्रम राबवावा तो म्हणजे कृषी व कृषिपूरक व्यवसायाकडे बघण्याचा त्याचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा. जगातील सर्वात सुंदर, निसर्गाबरोबर राहून अन्नदात्याचे काम करून आर्थिक लाभापेक्षा मानसिक समाधान किती मिळते याचा विचार केला तर या व्यवसायामध्ये आनंदी आनंद आहे. दुसरा कृती कार्यक्रम म्हणजे कृषी आणि कृषिपूरक व्यवसाय हा फक्त अडाणी माणसांनी करण्याचा व्यवसाय नाही. कारण यामध्ये आपला संबंध वनस्पती, झाडे, पशु-पक्षी निसर्गातील अनेक सजीवांशी असतो. सजीवांच्या स्वभावानुसार काम करत असताना निसर्गाचा लहरीपणाही सहन करावा लागतो. म्हणजेच हा व्यवसाय करण्यासाठी मोठ्या प्रमाणात ज्ञान, श्रध्दा आणि सबुरीची गरज आहे. इतर व्यवसाय पुस्तकी ज्ञानापासून सुरु करता येऊ शकतात परंतु कृषी व कृषिपूरक व्यवसाय सुरु करण्यासाठी पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रात्यक्षिके आणि कार्यानुभवातून मिळणाऱ्या ज्ञानाला जास्त महत्त्व आहे. विज्ञानातून मिळालेल्या ज्ञानाबरोबरच अनुभवाचीही शिदोरी सोबत घ्यावी लागते. त्यासाठी जेथे प्रात्यक्षिकाद्वारे आणि कार्यानुभवातून प्रशिक्षण दिले जाते तेथे वेळ काढून प्रशिक्षण घ्यावे. आपल्या मनाचे पूर्ण समाधान झाल्याशिवाय व्यवसाय सुरु करू नये. अर्धवट ज्ञान आणि आत्मविश्वासाचा अभाव यामुळे व्यवसायामध्ये अपयश येण्याचे प्रमाण वाढते. मात्र अपयशाचे खापर विनाकारण एखाद्या व्यवसायावर फोडले जाते! अपयशामुळे अनेकदा इतरांकडून अवहेलना केली जाते. त्यामुळे वयोवृद्धांनी तसेच समाजाने काही प्रमाणात या अपयशाकडे दुर्लक्ष

करून त्याला परत कशाप्रकारे उभारी देता येईल, त्याचा आत्मविश्वास कशाप्रकारे वाढविता येईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे.  यासाठी ग्रामीण भागामध्ये संघटन वाढविण्याची गरज आहे.  कृषी व कृषिपूरक व्यवसाय करताना एकत्रित येऊन समूहाच्या माध्यमातून व्यवसाय केला तर उत्पादनापासून ते विक्रीपर्यंतचे व्यवस्थापन करणे सोपे होते.  एकत्रित येऊन व्यवसाय केल्यास यश- अपयशाची एकत्रित चर्चा करून पुढील दिशा मिळण्यास मदत होते. आपला प्रतिस्पर्धी आपल्या गावातील किंवा तालुक्यातील शेतकरी होऊच शकत नाही. कारण आपण खुल्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करत आहोत याची जाणीव झाल्यास; गावातील किंवा परिसरातील युवकांना एकत्रित येऊन कृषी व्यवसाय करायला काही हरकत नाही.

## कल्याणकारी कृषी-योजनांचे पाठबळ गरजेचे

शेती क्षेत्राला शासनाच्या वतीने मोठ्या प्रमाणात सवलती मिळण्याची गरज आहे. आजही दरवर्षी १२० लाख हेक्टर क्षेत्रात नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान होऊन शेतकरी कर्जबाजारी होतात. यातून बाहेर काढण्यासाठी व निसर्गाच्या लहरीपणापासून शेती व शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी 'हवामानावर आधारित कृषिविमा' या संकल्पनेचा मोठ्या प्रमाणात अवलंब करण्याची गरज आहे. देशपातळीवर फक्त ४२ टक्के जमीन ओलिताखाली आहे तर महाराष्ट्रामध्ये २० टक्क्यांपेक्षा कमी क्षेत्र बागायती आहे.  पाण्याचा योग्य आणि काटकसरीने वापर करण्यासाठी व जमिनीचा पोत चांगला ठेवण्यासाठी सूक्ष्म सिंचन तसेच इतर आधुनिक सिंचन पध्दतींचा वापर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक पाठबळ शेतकऱ्यांना देण्याची गरज आहे.  तसेच कमी किंमतीमध्ये शेतीला आवश्यक अवजारे, औषधे, सेंद्रिय शेतीसाठी फेडरेशन, जिरायत भागातील शेतकऱ्यांसाठी ४ ते ५ वर्षांचे कृषिऋण चक्र (Agriculture Credit Cycle) आणि शेती व्यवसायाला शाश्वतता येण्यासाठी विशेष आर्थिक कोषाची निर्मिती यांसारख्या उपाययोजना केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या पातळीवर सुरु करण्याची गरज आहे.  आजही अनेक ठिकाणी उत्पादनाच्या किंमतीपेक्षा उत्पादन खर्च जास्त असल्यामुळे शेतकरी शासन आणि ग्राहकांना अनुदानाच्या स्वरुपात अन्नधान्याचा पुरवठा करत आहे. म्हणूनच शासन आणि समाजाने या व्यवसायाला आधार देण्याची गरज आहे.  कारण एकूण शेतकऱ्यांपैकी ८४ टक्के शेतकरी अल्प व मध्यम भूधारक आहेत. तसेच ४९ टक्के शेतकरी कर्जबाजारी आहेत. हा शेतकरी टिकला तरच शेती व्यवसाय टिकणार आहे आणि अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबन टिकून राहणार आहे.

## शेतीचे कौशल्यकेंद्री- तांत्रिक ज्ञान अनिवार्य

कृषी व कृषिपूरक व्यवसायाला सर्वात मोठी साथ हवी असेल तर ती ज्ञान पुरविणाऱ्या संस्थांची, अधिक पाठबळ देणाऱ्या वित्त संस्थांची तसेच विकासात्मक काम करणाऱ्या यंत्रणांची.  कारण त्यांच्या आधाराशिवाय युवा पिढीला कृषी व्यवसायामध्ये यशस्वी होणे अवघड आहे.  ग्रामीण युवकांना कृषी व कृषिपूरक व्यवसायाचे प्रात्यक्षिकाद्वारे शिक्षण देण्यासाठी मोठ्या प्रमाणात कार्य करण्यासाठी अनेक संस्थांना काम करावे लागेल.  त्यासाठी आय.टी.आय.च्या धर्तीवर कृषी क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करणाऱ्या संस्था निर्माण करण्याची गरज आहे. या संस्थांमधून पदवी, पदविकांचे केवळ पुस्तकी ज्ञानसंपन्न युवक- युवती तयार करण्याऐवजी, व्यावसायिक ज्ञान आणि कौशल्ययुक्त मनुष्यबळ निर्माण झाले तरच त्याला महत्त्व येणार आहे.  अशा युवकांवर येणारा खर्चही शासनाच्या रोजगार निर्माण योजनेतून केला जावा.  अर्थपुरवठा करणाऱ्या संस्थांनी कृषी व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. कारण या व्यवसायामध्ये वृध्दी झाली तरच भविष्यात सर्व समाज घटकांचे

पालन- पोषण होणार आहे. आज अनेक कृषी व्यवसायांसाठी अनेक योजना राबविण्यात येतात. परंतु त्यांची मागणी आणि पुरवठा यांमध्ये मोठी तफावत आहे. ग्रामीण भागात कृषिपूरक व्यवसायातून रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी स्वतंत्र अभियान सुरु करण्याची गरज आहे. याच अभियानातून ग्रामीण भागातील युवक- युवतींना स्वयंरोजगार मिळू शकेल. बेरोजगार युवक दारू व नशेच्या आहारी जातो, त्याच्या नशेखोरीमुळे समाज त्याला बहिष्कृत करतो. समाजाने दूर लोटल्यानंतर या तरुणामध्ये इतर वर्तनजन्य विकृती निर्माण होतात आणि त्यातून समाजाचे- पर्यायाने देशाचे नुकसान होते. या विकृतीतून जे नुकसान होईल त्याची किंमत समाज आणि एकूण देशाला भारी पडते.

**'सामाजिक इच्छाशक्तीची निविष्ठा'ही ठरेल पूरक!**

आज आपला कृषिप्रधान भारत देश एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. हा बुद्धिवंतांचा, कृषिप्रधान आणि ग्रामकेंद्री देश आज जगातील महाशक्तिशाली देशांच्या मांडीला मांडी लावून बसलेला आहे. आज जगातील १८ टक्के लोकसंख्या असलेल्या देशामध्ये सर्वात जास्त तरुण - युवा पिढी आपल्या देशामध्ये आहे. जास्त लोकसंख्येचा बाऊ न करता किंवा त्याच्याबद्दल चिंता करत बसण्यापेक्षा या तरुण व सळसळणाऱ्या लोकसंख्येच्या हातांचा व बुध्दीचा वापर करून महाशक्तिशाली देश, महासत्ता होण्यासाठी पुढे येण्याची हीच खरी वेळ आहे. आज देशाच्या प्रगतीचे सर्वच दरवाजे उघडलेले आहेत. त्यासाठी शासनाचे प्रयत्न आणि सक्रियतेबरोबरच समाजाची इच्छाशक्तीही जागृत होण्याची गरज आहे. देशाने मला काय दिले यावरच जास्त चर्चा करण्यापेक्षा मी देशाला तसेच समाजाला काय दिले किंवा काय देऊ शकतो याचाही विचार विशेषत: तरुण पिढीने करण्याची गरज आहे. पुढे जाण्यासाठी दुसऱ्याने पुढे व्हावे मग मी त्यामागे जाईन, ही भावना न ठेवता मी स्वत: माझ्यापासून सुरुवात करतो, ही भावना जागृत होण्याची गरज आहे. कोणताही व्यवसाय चांगला आहे परंतु तो चांगल्या मनाने आणि चांगल्या ध्येयाने केला तर त्यामध्ये यश येते. मग त्यात आर्थिक यश असो की मानसिक समाधानाच्या रुपाने मिळणारे यश असो, कृषिप्रधान देशातील ग्रामीण भारतातील युवा पिढीला कृषी व्यवसाय आपल्याकडे आकर्षित करत आहे.

जागतिक स्तरावरून कृषी व्यवसायाबद्दल एक चांगले विचारमंथन सुरु झालेले आहे. शेती व्यवसायाची वृध्दी झाली किंवा कमीत कमी तो व्यवसाय व्यवस्थित सुरु राहिला तरच देशाची प्रगती होईल याची जाणीव सर्वांनाच आहे. भारतासारख्या देशात तर कृषी व्यवसायाचा प्रगतीचा वेग वाढल्याशिवाय अर्थव्यवस्थेला स्थैर्य येणार नाही याची जाणीव झाली आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासासाठी शासन पातळीवर अनेक योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी सुरु झाली आहे. अर्थात या योजनांकडे फक्त अनुदानाच्या कुबड्यांवर आधारित शेती व्यवसाय म्हणून बघणे हितावह नाही. त्या अनुषंगाने कृषी व कृषिपूरक व्यवसायांचा सकारात्मक दृष्टिकोनातून विचार केला तर पुढील सर्व काळ आपल्या हातात आहे. त्यासाठी आपल्या अंर्तमनाला जागृत करण्याची गरज आहे. या सर्व बाबींचा युवा पिढीने अवलंब केला तर निश्चितच कृषी व्यवसायाला भावी काळ उत्तम आहे. ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक **संजय भास्कर पवार** यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : **डॉ. भास्कर गायकवाड.**

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.